THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 11TH MAY 1893.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम झंजिरे, मुंबई, तारीख २० माहे एप्रिल सन १८९३.

नंबर २८०१.—**हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट** ह्याच्या ७ व्या कलमाअन्वयें करण्याचें योजिलें आहे त्या कानूबद्दलच्या जाहिरनाम्याचा खालीं दिलेला मसुदा, ज्या इसमांचा त्या कानूंशीं संबंध असण्याचा संभव आहे त्या इसमांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध केला आहे. आणि ह्यावरून असें फर्माविण्यांत येत आहे कीं, ह्या जाहिरनाम्याच्या तारिखेपासून एका महिन्यानें ह्या मसुद्याचा आणि त्या वेळेपूर्वी ह्या कानूंच्या संबंधानें ज्या हरकती अगर सूचना रुजू करण्यांत येतील, त्यांचा विचार केला जाईल :—

सन १८८४ चा हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा **आक्ट** ह्याच्या ७ व्या कलमामध्यें दिलेले अधिकार चालवून, आणि **गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल** ह्यांच्या आधीं आणिलेल्या मंजुरीनिशीं, **आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल** ह्यांनीं, सन १८८७ चें मुंबई **सरकारी गझेट**, भाग १, ह्याच्या ९९९ व्या पृष्ठावर प्रसिद्ध केलेला जाहिरनामा नंबर ४११६ ह्यांतील २७ व्या कानूऐवजीं खालीं लिहिलेली कानू केली आहे :—

ह्यापुढें निर्दिष्ट केलेल्या अमलदारांस, ह्यापुढें निर्दिष्ट केलेल्या प्रदेशांच्या आंत—

(अ) ज्या कोणत्याही जागेंत, वाहनांत अगर तारवांत, सन १८८४ चा हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा **आक्ट**, ह्याखालीं दिलेल्या लैसेन्साअन्वयें कोणताही बारी पदार्थ तयार करण्याचें काम चालू असेल, अगर तसा पदार्थ कबजांत ठेविलेला असेल, अगर तो वापरण्याचें किंवा विकण्याचें काम चालू असेल, अगर तो एका जागेहून दुसऱ्या जागीं पाठविण्यांत येत असेल अगर आंत आणण्यांत येत असेल, त्या जागेंत, वाहनांत अगर तारवांत, किंवा ज्या कोणत्याही जागेंत, वाहनांत अगर तारवांत सदर्हू **आक्टाच्या** अगर त्याखालीं केलेल्या कानूंच्या ठरावांविरुद्ध कोणताही बारीपदार्थ तयार करण्यांत आला आहे अगर येत आहे, किंवा कबजांत ठेविलेला होता अगर आहे, किंवा वापरण्यांत आला आहे अगर येत आहे, किंवा विकण्यांत आला आहे अगर येत आहे किंवा एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यांत आला आहे किंवा अगर येत आहे, किंवा आंत आणण्यांत आला आहे अगर येत आहे असें वाटण्यास त्याला कारण असल्यास, त्यांस तशा कोणत्याही जागेंत, वाहनांत अगर तारवांत प्रवेश करण्याचा, तें पाहण्याचा व तपासण्याचा अख्त्यार आहे;

(ब) त्यांत बारी पदार्थ आहेत किंवा नाहींत हें पाहाण्यासाठीं त्यांचा झाडा घेण्याचा अख्त्यार आहे;

(क) त्यांत जे बारीपदार्थ सांपडतील त्यांचे नमुने, त्यांबद्दल किंमत देऊन, घेण्याचा अख्त्यार आहे; आणि

(ड) त्यांत सांपडलेल्या ज्या बारीपदार्थासंबंधानें सदहू आक्टांतील अगर त्याअन्वयें केलेल्या कानूंतील ठराव उल्लंघण्यांत आले आहेत असें वाटण्यास कारण असेल, तो बारीपदार्थ, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें धरण्याचा, अटकावून ठेवण्याचा, काढून नेण्याचा आणि सार्वजनिक सुरक्षितपणासाठीं जरूर असल्यास त्याचा नाश करण्याचा अख्त्यार आहे.

| प्रदेश. | अमलदार. |
|---|---|
| मुंबई इलाक्याच्या सर्व भागांत ... ... ... | खडकी येथिल गन पौडर फ्याक्टरीचा सुपरिंटेंडेंट. |
| आपापल्या जिल्ह्यांमध्यें ... ... ... | सर्व जिल्हा माजिस्ट्रेट.<br>जिल्हा माजिस्ट्रेटाचे ताबेदार असलेले सर्व माजिस्ट्रेट. |
| मुंबई शहर आणि बेट यांत ... ... ... | पोलीस कमिशनर.<br>इन्स्पेक्टरच्या खालील दर्जाचे नाहींत असे सर्व पोलीस अमलदार. |

अलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल,
यांच्या हुकुमावरून,
( सही. ) जी. डब्ल्यू. व्हाइडल,
आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.